सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://daininktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २४ डिसेंबर २०२५

आतील पानावर

पान २– ‘धुरंधर’च्या दुसऱ्या भागात सारा अर्जुन?
पान ३– ...तेव्हा मला हेवा वाटायचा
पान ४– राशीचे कहाण्यांना प्राधान्य
पान ५– ‘जेलर २’मध्ये विद्याची एन्ट्री
पान ६– इमरानसोबत झळकणार मराठमोळी अभिनेत्री

# बॉर्डर २ मध्ये सनी देओलचा खतरनाक लूक



बॉर्डर २ चित्रपटाचा टीझर कधी प्रदर्शित होणार याची आतुरतेने प्रेक्षक वाट पाहत होते. अखेर चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. भारतीय सैन्याच्या शौर्याची कथा पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात सनी देओल, वरुण धवन, दिलजीत दोसांझ आणि अहान शेट्टी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाच्या टीझरने उत्सुकता वाढवली आहे. टीझरची सुरुवात सनी देओलच्या आवाजाने होते, ज्यामध्ये तो म्हणतो, तुम्ही जिथे जिथे प्रवेश करण्याचा प्रयत्न कराल आकाशातून, जमिनीवरून, समुद्रातून तुम्हाला तुमच्या समोर एक भारतीय सैनिक उभा असलेला दिसेल. जो डोळ्यात पाहून अभिमानाने म्हणेल, ‘जर तुमच्यात हिंमत असेल तर या, हा भारत उभा आहे.’ यानंतर टीझरमध्ये १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध दाखवण्यात आले आहे. यानंतर शकरगड सेक्टरमध्ये एक स्फोट होतो आणि तिथे वरुण धवनचे पात्र दाखवले जाते. त्यानंतर पुढचा स्फोट श्रीनगर येथील आयएएफ तळावर होतो, जिथे दिलजीत दोसांझ जखमी झालेला दिसतो. उत्तर अरबी समुद्राचा आहे, जिथे अहान शेट्टी जखमी झालेला दिसतो. त्यानंतर सनी देओल येतो, जो मिसाईल गनमधून गोळीबार करताना दिसतो. अशा प्रकारे पात्रांची ओळख टीझरने करून दिली आहे. हा चित्रपट सत्य घटनेपासून प्रेरित असल्याचे टीझरमध्ये सांगण्यात आले आहे. हा टीझर २ मिनिटे ४ सेकंदाचा असून, टीझर पाहून चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. दिलजीत दोसांझ वायुसेनेतील सैनिकाची भूमिका साकारणार आहे, तर अहान शेट्टी नौदलातील सैनिकाची भूमिका साकारणार आहे. सनी देओल बॉर्डर मधील त्याच्या भूमिकेसारखीच भूमिका साकारणार आहे. अनुराग सिंग दिग्दर्शित बॉर्डर २ हा १९९७ च्या बॉर्डर चित्रपटाचा सिक्वल आहे. जेपी दत्ता दिग्दर्शित बॉर्डर चित्रपटाची कथा १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान लोंगेवालाच्या लढाईवर आधारित होती. बॉर्डर २ प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर २३ जानेवारी २०२६ मध्ये चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या टीझरनंतर ट्रेलर आणि गाणी कधी येणार याकडे चाहत्यांचे लक्ष आहे.



# राघव लॉरेन्सच्या चित्रपटात नोरा



राघव लॉरेन्सच्या कंचना फ्रेंचाइजीच्या चौथ्या चित्रपटासाठी कलाकार निश्चित झाले आहेत. यात पूजा हेगडे आणि नोरा फतेही-चे नाव सामील आहे. दोन्ही अभिनेत्री राघवसोबत पहिल्यांदाच काम करत आहे. तर 'कंचना ४' चित्रपटाद्वारे नोरा ही तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण करणार आहे. चित्रपटाचे चित्रिकरण यापूर्वीच सुरू करण्यात आले आहे. पूर्ण कंचना फ्रेंजाइजी लॉरेन्सकडून दिग्दर्शित असून तोच मुख्य भूमिकेतही आहे. फ्रेंचाइजीचा पहिला चित्रपट मुनी (२००७) होता, ज्यात त्याने राज किरणसोबत काम केले होते. २०११ मध्ये कंचना हा चित्रपट त्याने तयार केला, ज्यात सरथ कुमार यांनी मुख्य भूमिका साकारली होती. कंचना २ चित्रपटात तापसी पन्नू आणि नित्या मेनन यांनी मुख्य भूमिका साकारली होती. तर कंचना ३ चित्रपटात ओविका आणि वेधिका होती. कंचना ४ चित्रपट कलानिधी मारन यांचा सन पिक्चर्स आणि राघव लॉरेन्स्च्या राघवेंद्र प्रॉडक्शनकडून निर्माण करण्यात आला आहे. पूजा यापूर्वी कुली चित्रपटात दिसून आली होती. तसेच ती 'जन नायकन' या चित्रपटात दिसून येणार आहे.

# गोलमाल ५ ची स्टारकास्ट ठरली

प्रसिद्ध बॉलीवूड निर्माता- दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या ॲक्शन चित्रपटांसह कॉमेडी चित्रपटांची देखील प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असतात. गोलमाल या कॉमेडी चित्रपटाने रोहित शेट्टीला एक वेगळी ओळख मिळवून दिली. त्याने अनेक यशस्वी चित्रपट केले आहेत. सध्या गोलमाल ५ चित्रपटाच्या तयारीत रोहित व्यस्त आहे. सिंघम अगेननंतर प्रेक्षक या कॉमेडी फ्रँचायझीची आतुरतेने वाट पाहत आहेत. आता या चित्रपटातील कास्टिंगबाबत माहिती समोर आली आहे. या चित्रपटात बॉलीवूडमधील दोन प्रसिद्ध अभिनेत्रींना कास्ट करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अभिनेत्री करीना कपूर खान आणि सारा अली खान या दोन अभिनेत्रींची नावं अंतिम करण्यात आली आहेत. मात्र, अद्यापर्यंत याबाबत अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. याशिवाय अभिनेता कुणाल खेमू याला देखील चित्रपटात कास्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आता नव्या भागात आणखी कोणत्या कलाकारांचा समावेश होणार हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे. रिपोर्टनुसार, या चित्रपटाच्या कास्टिंगबाबत बरीच चर्चा झाल्यानंतर रोहित शेट्टीने करीना कपूर खान आणि सारा अली खानशी संपर्क साधला आहे. दोन्ही अभिनेत्री या चित्रपटाचा भाग होणार असल्याचे सांगितले जात आहे. रोहित शेट्टी तरुण लेखकांसोबत या चित्रपटाच्या पटकथेवर काम करत आहे. चित्रपटात अजय देवगणच्या विरुद्ध करीना कपूरला कास्ट करण्याची योजना आखली आहे. त्यामुळे करीना आणि सारा अली खान या अभिनेत्रींना सोबत स्क्रीन शेअर करताना पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. चित्रपटाचे चित्रीकरण पुढील वर्षी सुरू होण्याची अपेक्षा आहे.

# 'धुरंधर'च्या दुसऱ्या भागात सारा अर्जुन?

आदित्य धर लिखित, दिग्दर्शित धुरंधर हा सिनेमा नुकताच बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित झाला. प्रदर्शनाच्या ७ दिवसांनंतर सुद्धा बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाची जादू कायम आहे. सत्य घटनांवर आधारीत हा सिनेमा प्रेक्षकांची हाऊसफुल गर्दी खेचण्यास यशस्वी झाला आहे. सध्या सोशल मीडियासह चाहत्यांमध्ये या चित्रपटाबरोबर त्यातील कलाकारांचीही तितकीच चर्चा होताना दिसतेय. एकीकडे धुरंधरची सगळीकडे क्रेझ असताना निर्मात्यांनी या चित्रपटाच्या दुसर्या भागाची घोषणा केली. 'धुरंधर' सिनेमाचा पुढील भाग १९ मार्च २०२६ ला भेटीला येणार आहे. त्यामुळे दुसऱ्या भागात 'धुरंधर'ची कथा कशी वळण घेणार याची सर्वांना उत्सुकता आहे. अशातच धुरंधरच्या दुसऱ्या भागात अभिनेत्री सारा अर्जुन असणार की नाही? असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला होता. आता याबद्दल दिग्दर्शकाने सोशल मीडियावर एका पोस्टद्वारे अभिनेत्री सारा अर्जुन दुसर्या भागातही दिसणार की नाही, याची हिंट दिली आहे. या चित्रपटात रणवीर सिंग, संजय दत्त , अक्षय खन्ना आणि अर्जुन रामपाल यांच्या महत्वपूर्ण भूमिका आ-हेत. त्यासोबत धुरंधरच्या दुसऱ्या पार्टमध्ये सारा अर्जुनच्या एन्ट्रीवरही शिक्कामोर्तब झाला आहे. अलिकडेच सारा अर्जुनने दिग्दर्शक आदित्य धर यांच्यासोबतचा एक फोटो सोशल मीडियावर शेअर करत त्याला भावुक असं कॅप्शन दिलं आहे. या पोस्टमध्ये, गोल्डन हार्टवाला धुरंधर... असं म्हणत साराने तिच्या पहिल्या हिंदी चित्रपटात आदित्यने पूर्ण पाठिंबा दिला आणि सेटवर सुरक्षित वातावरण निर्माण केलं, असं तिने म्हटलंय. पुढे सारा म्हणाली, आदित्यकडे अनुभव आहेच शिवाय तो खूप समजुतदार आहे. त्याला कोणत्याही गोष्टीचा अहंकार नाही. तो संपूर्ण टीमला एकत्र बांधून ठेवतो आणि प्रत्येक कलाकाराचं मनोबळ वाढवतो.





**जे**ष्ठ अभिनेत्री जया बच्चन यांनी काही दिवसांपूर्वी पापाराझी कल्चरवर भाष्य करत पॅप्सला हिणवणारे विधान केले होते. त्यांनी केलेल्या विधानामुळे मोठा वाद निर्माण झाला असून, पाराराझींकडून तीव्र शब्दांत निषेध नोंदविण्यात आला आहे. यावर अनेक कलाकारांनी आपली मतंही नोंदवली आहेत. नुकतेच जया बच्चन यांच्या विधानावर जेष्ठ अभिनेते शत्रुघ्न सिन्हा यांनी भाष्य केल्यानंतर आता बॉलीवूडची आघाडीची अभिनेत्री हुमा कुरेशी हिने देखील आपले मत मांडले आहे. जे सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, त्यासाठी आम्ही त्यांना स्वतः बोलावतो. ते आम्हाला प्रमोट करतात. यामुळे सर्व दोष पॅप्सना देणे योग्य नाही, असे स्पष्ट मत हुमा कुरेशीने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत

# पापाराझी कल्चरवर सर्व ब्लेम नको

मांडले. प्रश्न विचारणे योग्य आहे, पण एखादाच्या खाजगी गोष्टी विचाराल तर ते मला योग्य वाटणार नाही. एक मर्यादा असते जी पार करू नये, पण अनेकदा ते करतात, असेही पॅप्सविषयी हुमा म्हणाली. पुढे अभिनेत्री म्हणाली, जेव्हा कुठे स्पॉट होण्याची इच्छा असते, तेव्हा स्वतः कॉल करतो. सर्व ब्लेम त्यांच्यावर टाकू नये. जेव्हा मूड नसतो तेव्हा ते विनंती करतात आणि फोटोग्राफर्स आदर करतात, असेही हुमाने सांगितले. पापाराझी कल्चरवर भाष्य करताना जया बच्चन यांनी हे कोण लोक आहेत? टाइट पॅन्ट घालून मोबाईल घेऊन फोटो काढतात. असे वक्तव्य केले होते. या वक्तव्यावर एका कार्यक्रमात अभिनेते शत्रुघ्न सिन्हा यांनी तुम्ही लोक पॅन्टही चांगली घालता आणि शर्टही चांगला घालता. आम्ही तुमचा खूप कदर करतो, असे म्हटले होते.

# 'पठाण'च्या सिक्वलची घोषणा?



**भ**न्साळी अभिनेता शाहरुख खानच्या 'पठाण' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठा धुमाकूळ घातला. या चित्रपटाने मोठी कमाई करत अनेक चित्रपटांचे रेकॉर्ड मोडीत काढले. चित्रपटातील शाहरुखच्या पात्राचे प्रेक्षकांनी खूप कौतुक केले. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर इतिहास रचत नवा रेकॉर्ड आपल्या नावे केला. त्यानंतर या चित्रपटाचा सिक्वल येणार असल्याची चर्चा होती. अखेर पठाण २ ची घोषणा करण्यात आली आहे. सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला असून, या व्हिडीओत पठाण २ ची घोषणा करण्यात आली आहे.

दुबईमध्ये आयोजित एका कार्यक्रमात पठाणच्या सिक्वलची घोषणा करण्यात आली आहे. या कार्यक्रमात शाहरुख खानच्या हस्ते एका टॉवरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्टेजवरून एका व्यक्तीने पठाण २ येणार असल्याचे जाहीर केले. सोशल मीडियावर हा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून या व्हायरल व्हिडिओमध्ये रिअल इस्टेट डेव्हलपरने शाहरुखच्या नावाने बांधलेल्या टॉवरचा उल्लेख करत, 'जर ब्लॉकबस्टर चित्रपट असेल तर त्याचा सिक्वेलही असतो.' असे स्टेजवरून बांधकाम व्यावसायिकाने म्हटले. त्यामुळे पठाणच्या सिक्वल येणार असल्याची चर्चा रंगली आहे. ही चर्चा होत असली तरी अद्यापर्यंत चित्रपटाच्या टीमकडून सिक्वलबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. असे असले तरी पठाणच्या सिक्वलच्या घोषणेमुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. या कार्यक्रमात शाहरुखच्या प्रतिक्रियेनंतर चाहत्यांच्या 'पठाण २' बद्दलच्या आशा आणखी वाढल्या आहेत.

# ...तेव्हा मला हेवा वाटायचा

**बॉ**लिवूडमधील लोकप्रिय जोडपं सैफ अली खान आणि करीना कपूर यांनी अनेक चित्रपटांत एकत्र काम केलं आहे. 'ओमकारा', 'एलओसी कारगिल' यांसारख्या चित्रपटांनंतर 'टशन'च्या शूटिंगदरम्यान त्यांच्या प्रेमकथेची सुरुवात झाली. २०१२ साली या दोघांनी लग्न केलं. आता सैफने त्यांच्या नात्याबद्दल एक प्रामाणिक प्रतिक्रिया दिली आहे.

नुकत्याच एका मुलाखतीत सैफ म्हणाला की, लग्नानंतर करीना इतर अभिनेत्यांसोबत काम करत असताना त्याला थोडा हेवा वाटायचा. ती इतर पुरुष कलाकारांसोबत काम करताना मला कसं वागायचं, हे कळत नव्हतं. माझ्यासाठी तो अनुभव नवीन होता. नातं नवीन असताना आणि स्वभावाने थोडा जास्त काळजी करणारा असाल, तर अशा भावना हाताळणं अवघड जातं, असं सैफने सांगितलं. तो पुढे म्हणाला, याआधी मी ज्या मुलींना भेटलो होतो, त्यांचा चित्रपटसृष्टीशी काही संबंध नव्हता. त्यामुळे हे सगळं माझ्यासाठी वेगळं होतं. एकदा असं वाटलं की, जे माझे प्रतिस्पर्धी आहेत, तेच तिचे सहकारी आहेत. पण हळूहळू हे सगळं समजून घेतलं आणि स्वीकारलं. शेवटी प्रेम सगळ्यावर मात करतं.

सैफने हेही स्पष्ट केलं की, तो करीनाच्या प्रत्येक प्रोजेक्टसाठी मनापासून शुभेच्छा द्यायचा. तिला यश मिळावं, तिच्या चेहऱ्यावर आनंद दिसावा, हेच मला महत्त्वाचं वाटायचं. जरी त्यासाठी मला माझ्या स्पर्धकांना पाठिंबा द्यावा लागला तरी, असं तो म्हणाला. शेवटी सैफ म्हणाला की, काळानुसार त्याचा विचार बदलत गेला आणि अधिक प्रगल्भ झाला. या इंडस्ट्रीत सगळ्यांसाठी संधी आहेत. सुरुवातीला सगळं नवीन होतं, तेव्हा करीनानेच मला समजावून सांगितलं, असंही त्याने नमूद केलं.





# संजीदा खानला मिळाली मोठी संधी

बॉलिवूडच्या दिग्गज अभिनेत्यांमध्ये सामील सनी देओल आणि अक्षय खन्ना पुन्हा एकदा एकत्र येणार आहेत. ही जोडी एका हाय-व्होल्टेज ॲक्शन थ्रिलर चित्रपटात काम करणार असून यात अभिनेत्री संजीदा शेखही दमदार भूमिका साकारताना दिसून येणार आहे. संजीदा शेखचा हा चित्रपट ओटीटी प्रोजेक्ट असून तो पूर्णपणे डिजिटल प्रेक्षकांना डोळ्यासमोर ठेवून तयार केला जातोय. या चित्रिकरण मुंबईत पार पडणार आहे. याच्या कहाणीत संजीदा शेख महत्त्वाचा हिस्सा असणार आहे. तिची भूमिका चित्रपटात भावनिक खोली जोडणारी असल्याचे सांगण्यात आले आहे. हा चित्रपट कुठल्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर येणार हे अद्याप स्पष्ट नाही. या चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ पी. मल्होत्रा करत असून तो स्वत:ची दमदार कहाणी आणि स्टायलिश ट्रीटमेंटसाठी ओळखला जातो. अक्षय खन्ना धुरंधर चित्रपटातील स्वत:चा लुक आणि अभिनयामुळे सध्या गाजत आहे. तर सनी देओल यांचा 'बॉर्डर २' हा चित्रपटही चर्चेत असून यात वरुण धवन आणि दिलजीत दोसांझ दिसून येणार आहे. संजीदाने अलिकडेच 'हीरामंडी' आणि 'फायटर'मधील स्वत:च्या अभिनयाद्वारे प्रेक्षक अन् समीक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे.



# राधिकाला 'या' सिनेमाचे पैसेही मिळाले नाहीत

राधिका आपटे मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. तिने मराठीसह हिंदीतही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. नुकतेच तिला या इंडस्ट्रीत २० वर्ष पूर्ण झाली आहेत. अशातच तिने तिच्या 'वाह लाईफ हो तो ऐसी' या चित्रपटामध्ये काम करण्याचा अनुभव सांगितला आहे. राधिका म्हणाली, त्या चित्रपटाचे निर्माते खूपच वाईट होते. त्यांनी माझ्या राहण्याची सोय केली नाही, पैसेही दिले नाहीत. माझ्या आईने आणि मी जेव्हा करारावर सही करण्यासाठी विचारलं तेव्हा ते म्हणाले, अरे उर्मिला मातोंडकरनेही करार केला नव्हता. तिने केला की नाही मला माहिती नाही, पण आम्हाला खूप वाईट वागणूक दिली गेली. राधिका पुढे म्हणाली, महेश मांजरेकर खूप छान वागले, पण तरीही त्या चित्रपटाची आठवण काढायला मला आवडत नाही, कारण निर्मिती संस्थेचा अनुभव खूपच खराब होता आणि हे मी उघडपणे सांगते. यावेळी तिने तिला तिच्या या चित्रपटाबद्दल बोलायला आवडत नाही असे सांगितले. राधिका यावेळी महेश मांजरेकर यांच्याबद्दल म्हणाली, मी ब्रेन सर्जन नावाचं नाटक करत होते, त्यासाठी आम्हाला राज्य शासनाचा पुरस्कारही मिळालेला. महेश मांजरेकरच त्या परीक्षकांपैकी एक होते. त्यांनी मला बोलावलं आणि सांगितलं की मला तुला कास्ट करायचं आहे. राधिकाने पुढे सांगितलं की, त्यावेळी महेश मांजरेकर तीन चित्रपटांवर काम करत होते, पण त्यातील दोन चित्रपटांसाठी राधिकाचं वय खूप लहान होतं. एक २००४ मधील 'रक्त' हा चित्रपट आणि दुसरा २००७ मध्ये आलेला 'देह' हा सिनेमा. राधिका पुढे म्हणाली, त्यानंतर मी बराच काळ चित्रपट केला नाही. मी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलं आणि मग नंतर चित्रपटांमध्ये काम करायला सुरुवात केली, त्यामुळे मी 'वाह लाईफ हो तो एसी' या चित्रपटाची माझा पहिला चित्रपट म्हणून गणना करत नाही. त्याला आता दोन दशकं झाली आहेत. राधिकाने त्यानंतर बंगाली आणि मराठी चित्रपटांमध्ये काम केलं. त्यानंतर तिने २०१० मध्ये राम गोपाल वर्मा यांच्या 'रक्त चरित्र' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये खऱ्या अर्थाने पदार्पण केलं.

# राशीचे कहाण्यांना प्राधान्य

अभिनेत्री'१२० बहादुर' या चित्रपटातील अभिनयाद्वारे राशी खन्नाने चाहत्यांची मने जिंकली आहेत. राशी खन्नाने स्वत:च्या कारकीर्दीविषयी मत व्यक्त केले आहे. कलाकार म्हणून विकसित होतेय आणि ही प्रक्रिया प्रत्येक चित्रपटासोबत चालत राहते. मी वेगवेगळ्या भूमिका साकारण्याचा प्रयत्न करत असते. प्रत्येक व्यक्तिरेखेद्वारे काही ना काही शिकता येते, असे राशीने म्हटले आहे.


कमर्शियल चित्रपट करणे मला पसंत आहे, दाक्षिणात्य चित्रपटांमुळे माझ्या कारकीर्दीला मोठा हातभार लागला. तर 'फर्जी' या वेबसीरिजमुळे मला लोकांनी गांभीर्याने घेण्यास सुरुवात केली. माझ्यासाठी माध्यमापेक्षा कहाणी महत्त्वाची आहे. याचमुळे मी '१२० बहादुर' आणि 'साबरमती रिपोर्ट' या चित्रपटांमध्ये काम करण्यास होकार दिला होता, असे राशीने म्हटले आहे. 'फर्जी २' मध्ये माझी व्यक्तिरेखा कुठल्या दिशेला जाईल हे सध्यातरी मला माहिती नाही. परंतु स्वत:ची व्यक्तिरेखा समजून घेण्यासाठी फर्जी सीरिज मला पुन्हा पहावी लागणार आहे. जानेवारी महिन्याच्या अखेरीस आम्ही याचे चित्रिकरण सुरू करणार आहोत, असे राशीने सांगितले आहे. राशी आगामी काळात 'तलाकों में एक' या चित्रपटात दिसून येणार असून यात ती एका बंगाली युवतीची भूमिका साकारत आहे.



# वजन घटवण्याचा 'भल्लालदेव' फॉर्म्युला


कन्नड तेलगू, तमिळ आणि हिंदी चित्रपटांत काम करणारा अभिनेता राणा दग्गुबती सध्या त्याच्या बारीक लूकमुळे चर्चेत आहे. 'बाहुबली'मध्ये अवाढव्य शरीरयष्टी कमावल्यानंतर, आता त्याने डाएट आणि व्यायामाच्या जोरावर आपले वजन प्रचंड घटवले आहे. हे परिवर्तन त्याने कसे साध्य केले, ते जाणून घेऊया...

'बाहुबली'मधील भल्लालदेवाची भूमिका शक्तिशाली दिसण्यासाठी राणाने सुमारे १८-२० किलो वजन वाढवले होते. मात्र, त्यानंतर NTR महानयाकुडु'मध्ये चंद्राबाबू नायडू यांची भूमिका साकारण्यासाठी आणि 'हाथी मेरे साथी'मधील पात्रासाठी त्याला तब्बल २३-३० किलो वजन कमी करावे लागले. एका मुलाखतींमध्ये ४१ वर्षीय राणाने स्पष्ट केले की, एका खऱ्या आयुष्यातील राजकारण्याची भूमिका साकारताना तो 'भल्लालदेवा'सारखा पिळदार शरीरयष्टीचा दिसू शकत नव्हता, त्यामुळे वजन कमी करणे गरजेचे होते. त्याने प्रांजळपणे कबूल केले की, ही पद्धत आरोग्यासाठी अत्यंत चुकीची होती आणि यामुळे त्याला अशा काही समस्या जाणवल्या, ज्यावरून हे बदल किती टोकाचे होते याची जाणीव झाली. तो पुढे असेही म्हणाला की, एखाद्या भूमिकेसाठी हे ठीक असले, तरी दीर्घकाळासाठी हे कोणीही करू नये असा सल्ला त्याने दिला आहे. 'बाहुबली' चित्रपटासाठी राणाने बॉडीबिल्डरप्रमाणे प्रशिक्षण घेतले होते. जेव्हा वजन कमी करण्याची वेळ आली, तेव्हा त्याने वजन उचलणे बंद केले आणि आपले पूर्ण लक्ष कार्डिओ व्यायामावर केंद्रित केले. त्याने जिममधील नियमित स्ट्रेंथ ट्रेनिंग थांबवले, जेणेकरून चरबीसोबतच शरीरातील मसल्सचे प्रमाण कमी करता येईल. राणा सांगतो की, तो फिटनेसकडे आवडीपेक्षा त्याच्या कामाची अत्यावश्यक जबाबदारी म्हणून पाहतो. वजन कमी करण्याच्या टप्प्यानंतरही राणा काही सवयींचे पालन करतो.



# 'जेलर २'मध्ये विद्याची एन्ट्री

दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत वयाच्या ७५ व्या वर्षीही तितक्याच जोमाने काम करताना दिसतात. सध्या ते त्यांच्या बहुचर्चित चित्रपट 'जेलर २'च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहेत. अशातच या चित्रपटाबाबत एक मोठी आणि उत्सुकता वाढवणारी बातमी आली आहे. दिग्दर्शक नेल्सन दिलीपकुमार यांच्या दिग्दर्शनाखाली २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जेलर' चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जगभरात ६०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली होती. या यशानंतर आता 'जेलर २' येत असल्याने चाहत्यांमध्ये उत्साह आहे. माहितीनुसार, या चित्रपटात अभिनेत्री विद्या बालन झळकणार आहे. वृत्तानुसार विद्याने नुकताच हा चित्रपट साइन केला असून तिला चित्रपटाची कथा खूप आवडली आहे. 'जेलर २'मध्ये ती एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार असून तिच्या भूमिकेमुळे कथेला वेगळं वळण मिळणार असल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, तिच्या भूमिकेचं नाव अद्याप जाहीर करण्यात आलेलं नाही. वृत्तानुसार, 'जेलर २' १४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचं शूटिंग १० मार्च रोजी चेन्नईमध्ये सुरू झालं होतं. त्यानंतर गोव्यातही चित्रीकरण करण्यात आलं असून आता जवळपास संपूर्ण शूटिंग पूर्ण होत आले आहे.



# 'नीलांबरी पदयप्पा २'मध्ये राम्या कृष्णन



दाक्षिणात्य पदयप्पा' या चित्रपटाच्या प्रदर्शनाला अलिकडेच २५ वर्षे पूर्ण झाली असून आता रजनीकांत यांनी याच्या सीक्वेलची घोषणा केली आहे. के.एस. रविकुमार यांच्या दिग्दर्शनातील मूळ चित्रपट प्रचंड गाजला होता, यात राम्या कृष्णन यांनी नीलांबरी ही भूमिका साकारली होती. हा चित्रपट १९९१ मध्ये प्रदर्शित झाला होता, तेव्हा हा तमिळ चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला होता.

रजनीकांत यांनी आता या प्रोजेक्टशी निगडित स्वत:च्या आठवणी व्यक्त करत ३७ मिनिटांचा व्हिडिओ शेअर केला आहे. स्वत:च्या ५० वर्षांच्या करियरमध्ये मी कधीच महिलांना चित्रपट पाहण्यासाठी गेट तोडताना पाहिले नव्हते, परंतु पदयप्पा चित्रपटावेळी महिलांनी हे धाडस केले होते असे रजनीकांत यांनी म्हटले आहे. जेव्हा मी २.० आणि जेलर २ यासारखे सीकेल पाहतो, तेव्हा पदयप्पा २ का नाही असा प्रश्न स्वत:ला विचारतो. या नव्या चित्रपटाचे नाव 'नीलांबरी: पदयप्पा २' असेल. हा चित्रपट प्रेक्षकांसाठी रोमांचक असेल आणि यावर मी काम करत आहे असे रजनीकांत यांनी म्हटले आहे.



# राजा शिवाजी मधील लुक समोर

अभिनेता रितेश देशमुखचा 'राजा शिवाजी' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. यात रितेश स्वत: छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय बॉलीवूडचे कलाकार या सिनेमात झळकणार आहेत. नुकतेच या चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाले. रितेशने मागे तळपता सूर्य आणि समोर छत्रपती शिवाजी महाराजांच्या लूकमधला फोटो पोस्ट करत लिहिले, क्षणभर थांबलेला सूर्यमावळतीचा मावळ..पण क्षणभरासाठीचउद्याच्या तेजस्वी पहाटेसाठी १०० दिवसांची मेहनत, निष्ठा, समर्पण आणि अपार जिद्द यावर अखेर पडदा पडला. असंख्य आठवणी, असंख्य अनुभव, आणि मनात कायम राहणारे क्षण. महापराक्रमी राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराजांना सिनेमारूपी अभिवादन घेऊन लवकरच येत आहोत. रितेशने 'राजा शिवाजी' सिनेमाचं शूटिंग पार पडल्यावर कृतज्ञता व्यक्त करत सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये अभिनेत्याने स्टारकास्टच्या यादीत विद्या बालनला सुद्धा टॅग केलं आहे. आता सिनेमात कोणते कलाकार कोणती भूमिका साकारणार याचा उलगडा टीझर प्रदर्शित झाल्यावर होईल. रितेश देशमुखने हा सिनेमा स्वत: दिग्दर्शितही केला आहे. तर ज्योती देशपांडे आणि जिनिलिया देशमुखने सिनेमाची निर्मिती केली आहे. रितेशने पोस्टमध्ये संजय दत्त, अभिषेक बच्चन, विद्या बालन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, भाग्यश्री लिमये, फरदीन खान, जितेंद्र जोशी यांना टॅग केले आहे. सिनेमाची ही तगडी स्टारकास्ट पाहता प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. पुढील वर्षी १ मे २०२६ रोजी हा सिनेमा मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगु, कन्नड आणि मल्याळम भाषेत रिलीज होणार आहे.

# 'गोट्या गँगस्टर' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

राजेश पिंजानी त्यांनी दिग्दर्शित केलेला 'गोट्या गँगस्टर' चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच त्यांचं हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. त्यामुळे राजेश पिंजानी यांचा हा शेवटचाच चित्रपट ठरला. यामुळे राजेश पिंजानी यांना श्रद्धांजली म्हणून हा चित्रपट २६ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे. 'गोट्या गँगस्टर' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. मुंबईतील एका चाळीत राहणार्या तीन मित्रांची गोष्ट गोट्या गँगस्टर या चित्रपटांतून उलगडणार आहे. आयुष्यात घडणाऱ्या काही घटनांमुळे त्या तिघांवर किडनॅपिंग करण्याची वेळ येते. त्या दरम्यान, काही वर्षांपूर्वी मुंबई सोडून थेट दुबईला पळून गेलेला डॉन चिमण भाई अचानक मुंबईत परततो. त्यानंतर विनोदी प्रसंग, भन्नाट संवाद आणि न संपणारी धमाल या चित्रपटात पहायला मिळणार आहे. अत्यंत खुसखुशीत गोष्ट, उत्तम अभिनेत्यांची फौज या चित्रपटात आहे. या कथानकाविषयीची उत्सुकता ट्रेलरमधून वाढली आहे.




अन्नपूर्णा प्रॉडक्शन्स निर्मित 'गोट्या गँगस्टर' या चित्रपटाची निर्मिती अन्नपूर्णा बिरादार, राजेश्री बिरादार, संदीप बिरादार आहेत, तर चित्रपटाची प्रस्तुती ऋतुजा पाटील आणि शिव लोखंडे यांनी केली आहे. राजेश पिंजानी यांनी लेखन दिग्दर्शन केलेल्या या चित्रपटात उत्तम स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. प्रवीण तरडे, प्रथमेश परब, डॉ. मोहन आगाशे, श्रीकांत यादव, अश्विनी गिरी, भूषण मंजुळे, विनोद वणवे, मुकूंद वसुले यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत.

# इमरानसोबत झळकणार मराठमोळी अभिनेत्री

बाईपण' बॉलिवूड अभिनेता इमरान हाश्मी लवकरच एका नव्या प्रोजेक्टमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'तस्करी: द स्मगलर्स वेब' नावाच्या वेब सीरिजमध्ये तो पाहायला मिळणार आहे. विशेष म्हणजे मराठमोळी अभिनेत्री अमृता खानविलकर त्याच्यासोबत झळकणार आहे.

'तस्करी' वेब सीरिज नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. यात बॉलिवूडचे अनेक मोठे कलाकार पाहायला मिळणार आहे. सीरिजमध्ये झोया अफरोज, फ्रेड्डी दारुवाला, अनुजा साठे, नंदिश सिंग संधू आणि शरद केळकर हे कलाकार झळकणार आहेत. तस्करीच्या दुनियेत तुमच्या सगळ्यांचं स्वागत आहे, असं म्हणत अमृताने टीझर पोस्ट केला आहे. या व्हिडिओत तिचा लूक प्रभावी दिसत असून, ती एका वेगळ्याच अवतारात दिसणार असल्याचं स्पष्ट झाले आहे. मात्र 'तस्करी'मध्ये अमृता नेमकी कोणती भूमिका साकारणार, याबाबत माहिती देण्यात आलेली नाही. इमरान हाश्मीसोबत यापूर्वी मराठी अभिनेत्री सई ताम्हणकरने 'ग्राउंड झिरो' चित्रपटात काम केले होते. आता अमृता त्याच्यासोबत दिसणार असल्याने चाहते देखील वेबसिरिज पाहण्यासाठी उत्सुक आहेत. 'तस्करी' वेब सीरिजचे दिग्दर्शक नीरज पांडे आहेत. काही दिवसांपूर्वी अमृता खानविलकरने चाहत्यांना नव्या वर्षात रंगभूमीवर पदार्पण करणार असल्याचे सांगितले होते. ती पहिल्यांदाच नाटकात काम करणार आहे. तिच्या या नाटकाचे नाव 'लग्न पंचमी' असून ती अभिनेता स्वप्नील जोशीसोबत झळकणार आहे. त्यामुळे एकंदरीतच अमृताने २०२५ वर्षाच्या शेवटी चाहत्यांना सरप्राईज दिले आहे.



# 'व्हिनस ऑफ दि स्क्रीन' रुपेरी पडद्यावरची सौंदर्य देवता : मधुबाला

'थंडी हवा काली घटा, आही गयी झुमके। प्यार लिये डोले हसी, नाचे जिया झुमके ।।''मिस्टर अँड मिसेस ५५' या चित्रपटातील संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या तारुण्य प्रसवणाऱ्या मूडमधील गीता दत्तच्या जादुई आवाजात, पडद्यावर हातातील छत्र्या गोल फिरवित महामिश्कील मधुबाला व तिच्या दोन सख्यावर हे गाणे खुमासदारपणे चित्रित झाले. मधुबालाचा दिलखुलास अभिनय व फाळके अवॉर्ड विनर व्ही. के. मूर्ती यांच्या छायाचित्रणाच्या आविष्काराने हा प्रसंग व हे गाणे आजतागायत लक्षात आहे. खरे सांगू! मधुबालाने सदा हसत राहावे, फुलपाखरासारखे स्वच्छंद बागडावे, सदा रोमँटिक मूड उजागर करावा. परमेश्वराने तिला पृथ्वीवर दुसऱ्यांना प्रेमाच्या नशेत डुंबण्यासाठीच पाठविले. म्हणूनच की काय, प्रत्यक्ष देविका राणीने तिचे मुमताज नाव बदलून मधुबाला ठेवले. मधुबाला म्हणजे मधुशालेतील साकी. जी जगाला सुखद नशा प्रदान करून दुःख विसरायला लावते.



'मै मधुबाला! मधुशाला की मधुबाला का क्षण क्षण बनकर मतवालार। उषा का दीप लिए सर पर। मै आयी करती उजीयाला। मैने इसमे जीवन डाला मै मधुबाला! मधुशाला की मधुबाला' हिंदीतील ख्यातनाम कवी हरिवंश राय बच्चन यांनी १९४० च्या दरम्यान लिहिलेल्या 'मधुशाला' कवितेतील या ओळी मधुबालाच्या जीवनाशी जुळतात. मधुबाला म्हणजे साक्षात स्वर्गातून उतरलेली परीच होती, असे फिल्म इंडियाचे सर्वेसर्वा बाबुराव पटेल म्हणायचे. केदार शर्मा यांच्या १९४६ सालच्या 'नीलकमल' चित्रपटाद्वारे बेबी मुमताजचे मधुबाला व रणवीर कपूरचे राज कपूर म्हणून बारसे झाले. 'आयेगा आयेगा आयेगा आनेवाला...' मधुबालाला १९५० साली 'महल' या बिग बॅनरच्या चित्रपटात संधी मिळाली. वरील आयकॉनिक गाण्याने मधुबाला व लता मंगेशकर यांचे भाग्य उजळले. या गूढरम्य चित्रपटात आशा व कामिनी ही दोन व्यक्तिमत्त्वे अत्यंत अनुभवी अभिनेत्रीसारखी अभिनित केली व देशभरच्या आकाशात मधुबाला नावाचा तारा देदीप्यमान झाला.

'तेरे सदके बलम न करे कोई गम' १९५४ सालच्या 'अमर' चित्रपटात नायकाची नाराजी दूर करण्यासाठी या गाण्यातून ती प्रयत्न करते. वरील ओळ म्हणून मोठी अंगडाई देऊन छद्मी हास्यातून त्याला चिडविण्याचा अभिनय करताना गोड शिसारी आणते. संगीत कला ही चित्तवृत्तीना जन्म देते. चित्तवृत्तींना उजाळा देऊन खऱ्या अर्थी मधुबाला सौंदर्यवान बनली. 'नैन मिले नैन हुये बावरे। चैन कहाँ मेरे सजन सावरे।' १९५१ च्या 'तराना' चित्रपटाच्या दरम्यान मधुबाला व दिलीपकुमारचे खर्या अर्थी पडद्याबाहेरील प्रेम फुलले होते. त्याचा आविष्कार या गाण्यात पाहायला मिळाला. मधुबालाने या गाण्यातील प्रत्येक कडव्यात लडिवाळप्रेमाचे अलग अलग भाव अभिनित केले.

मधुबालाच्या जीवनातील माईल स्टोन म्हणजे 'मुगल-ए-आझम' चित्रपटात साकारलेली अनारकलीची भूमिका! निमिष मिटलेल्या अवस्थेत पुतळ्याच्या रूपात तिचे संगमरवरी सौंदर्य प्रदर्शित केले. पुतळा अवस्थेतून वास्तवात आल्यावर निमिषाचे आवरण झुगारल्यावरचे तिच्या नेत्रकमलाचे सौंदर्यही निर्मात्याने दर्शकांना दाखविले. एका प्रसंगात एक्स्ट्रिम क्लोजअपमध्ये दिलीपकुमार तिच्या चेहर्यावर पांढऱ्या पक्ष्याचे लांब पीस फिरवून तिला कुरवाळतो. ती लज्जेने पापण्या मिटून आत्यंतिक प्रेमभाव चेहर्यावर प्रकट करते. या लांब शॉटमध्ये एकही संवाद नाही. 'जब रात है ऐसी मतवाली तो सुबह का आलम क्या होगा' मधुबाला व निगार सुलताना यांच्यातील या कव्वालीनंतर सलीम निगारला गुलाब देतो व मधुबालाला काट्याची दांडी देतो. त्यावर मधुबाला उत्तर देते. 'जाह-ए-नसीब, काटों को मुरझ्याने का खौफ नही. फूल तो मुरझ्या जाते है लेकिन काटे दामन थाम लेते है।' अनारकलीला साखळदंडात बांधून शिपाई अकबर बादशाहच्या समोर आणून ढकलतात. ती जमिनीवर आपटते. मुश्किलीने उठून मानेला हिसका देताना तिच्या घामाने थबथबलेल्या चेहर्यावर व डोळ्यात अन्यायाची भावना अभिनित करतांनाचे अप्रतिम संवाद! संवादफेकीत निष्णात असलेले पृथ्वीराज व मधुबाला यांच्या जुगलबंदीचा हा प्रसंग खूप लोकप्रिय झाला होता. 'तन भीगा है, सर गीला है । उसका कोई पेच भी ढिला है' 'चलती का नाम गाडी' चित्रपटातील प्रसंग- जागेपनी पडलेल्या स्वप्नात समोर प्रत्यक्ष लावण्य उभे असल्यामुळे क्षणभर गोंधळल्यावर किशोरकुमार वरील अंतर्यात तिला चिडविण्याचा अवखळ प्रयत्न करताना ओलेती स्वरूपातील मधुबाला, लटक्या कोपात भिवया वक्र करून लज्जा व अनुरागाच्या आविर्भावात तिच्या लोभस अभिनयाचे क्लोजअप कॅमेरामनने अचूक टिपले.

'फूल से गालोपे रुकने को तरसता पानी' 'बरसात की रात' या चित्रपटातील हे गाणे. यशस्वी प्रेमाच्या कल्पनेत रमलेल्या मधुबाला, वरील रेडिओवर प्रियकराने तिला उद्देशून गायलेले गाणे ऐकत गाण्याबर हुकूम मोहरून गेल्याचा अभिनय जिवंतपणे साकारतात. ओल्या केसांवरून ओघळणारे जलबिंदू खोडकरपणे तिच्या कपोलावर काही क्षण थांबतात. तेव्हा कपोल थरथरून गुदगुल्या झाल्याचा अभिनय केवळ अप्रतिम! साहिरचे काव्य व मधुबालाचा अभिनय! सारेच दिव्य! १४ फेब्रुवारी १९३३ रोजी बालपणी बेबी मुमताज नावाचे हे गुलाबपुष्प दिल्ली येथील अताउल्लाखां यांच्या संसारबागेत उमलले. तिला बालपणापासून गुलाब फार आवडायचा. तिच्याबरोबर काम करणार्या नायकांना ती गुलाब द्यायची. तिच्या वैयक्तिक जीवनात तिला अतोनात शारीरिक व मानसिक यातना सहन कराव्या लागल्या. १६ ऑक्टोबर १९६० रोजी ती किशोरकुमारची (अब्दुल करीम) ची बीबी झाली. तिला सवाष्ण म्हणून भाळावर कुंकू लेवून देवाघरी जायचा दिवस आला. २३ फेब्रुवारी १९६९ रोजी हे देवाघरचे लेणे देवाघरी गेले. जणू पृथ्वीवरील सौंदर्य संपले. कुणीतरी तिच्या अस्तित्वातील दिवसांबद्दल लिहून ठेवले होते... 'वो दिन भी क्या दिन थे जब पसीना गुलाब था'

रमेश पतंगे

# रजनीकांतसोबत नाते तुटले तरी धनुष देतो आदर



सुपरस्टार रजनीकांतचा १२ डिसेंबर रोजी ७५ वा वाढदिवस साजरा झाला आणि या खास दिवशी चाहत्यांपासून ते चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठ्या स्टार्सपर्यंत सर्वांनी सोशल मीडियावर त्यांना शुभेच्छा दिल्या. यामध्ये त्यांचे जावई धनुष विशेषपणे पुढे होते. रजनीकांतच्या मुली ऐश्वर्यासोबत ब्रेकअप झाल्यानंतरही धनुषने त्यांच्या सासर्यांचा मनापासून आदर राखला आहे आणि आज त्यांना अभिनंदन करण्यास मागेपुढे पाहिले नाही. धनुषने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत लिहिले, हॅपी बर्थडे थलायवा, हात जोडलेले आणि प्रेमाने भरलेले डोळ्यांचे इमोजीसह. ही पोस्ट पहाटे १:५२ वाजता शेअर केली गेली आणि लगेच व्हायरल झाली. चाहत्यांनी कमेंट सेक्शनमध्ये आपली प्रतिक्रिया व्यक्त करत, धनुषच्या आदरभावनेचे कौतुक केले. एका व्यक्तीने लिहिले, ते अजूनही एकमेकांचा आदर करतात, तर दुसर्या व्यक्तीने म्हटले, धनुष खरोखरच एक सज्जन आहे. धनुष आणि ऐश्वर्याची प्रेमकहाणी चित्रपटाच्या पटकथेसारखीच सुंदर होती. २००३ मध्ये धनुषचा 'काधल कोंडे' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर ऐश्वर्या आणि तिची बहीण सौंदर्या त्याच्या अभिनयाने प्रभावित झाल्या. दुसऱ्या दिवशी ऐश्वर्याने त्याला फुलांचा गुच्छ आणि कौतुकाचा संदेश पाठवला. यानंतर दोघांमध्ये संवाद सुरू झाला, जो हळूहळू प्रेमात फुलला. काही महिन्यांतच, कुटुंबियांच्या संमतीने, त्यांनी १८ नोव्हेंबर २००४ रोजी लग्न केले. या जोडप्याला दोन मुले-यात्रा आणि लिंगा- ही झाली. तथापि, जानेवारी २०२२ मध्ये त्यांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याची घोषणा केली आणि २७ नोव्हेंबर २०२४ रोजी घटस्फोट अधिकृत झाला. घटस्फोटानंतरही धनुष आणि रजनीकांत यांच्यातील नाते आदर आणि सुसंवादाने परिपूर्ण आहे. दोन्ही कुटुंबे ऐश्वर्याच्या मुलांच्या संगोपनात एकत्र काम करत आहेत. यात्राच्या पदवीदान समारंभासारख्या महत्त्वाच्या प्रसंगी ते एकत्र दिसतात, जे त्यांच्या नात्यातील परिपक्वतेचे उदाहरण आहे. रजनीकांत यांनी अनेकदा धनुषच्या प्रतिभेचे आणि व्यक्तिमत्त्वाचे कौतुक केले आहे, आणि घटस्फोटानंतरही कोणत्याही मतभेदाचे चिन्ह नाही. एकंदरीत, ऐश्वर्यापासून वेगळे होऊनही धनुष आणि रजनीकांत यांच्यातील आदर, सुसंवाद आणि कौटुंबिक एकजूट कायम आहे, ज्यामुळे त्यांच्या मुलांसाठी निरोगी आणि प्रेमळ वातावरण टिकून राहते.

# पुन्हा दिग्दर्शन करणार कोंकणा

कोंकणा सेन शर्माने केवळ एक अभिनेत्री म्हणून नव्हे तर दिग्दर्शिका म्हणूनही ओळख निर्माण केली आहे. २०१६ मध्ये तिने 'डेथ इन द गंज' या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. तसेच ती 'लस्ट स्टोरीज २'ची सह-दिग्दर्शिका राहिली आहे. आता अभिनेत्रीने स्वत:च्या आगामी दिग्दर्शकीय प्रोजेक्टविषयी माहिती दिली आहे. एक कॉमेडी शो-चे दिग्दर्शन करणार आहे. याची कहाणी मी स्वत:चा महाविद्यालयीन मित्र जयदीप सरकारसोबत मिळून लिहित आहे. या प्रोजेक्टवरून मी काहीशी घाबरलेली असली तरीही याच्या कामात मजा येणार असल्याचे तिने म्हटले आहे. कोंकणा सेन शर्मा स्वत:च्या दिग्दर्शकीय शोमध्ये काम करणार नसल्याचे समजते. माझ्याकडे अनेक चांगले कलाकार आहेत, यामुळे मी गोष्टींना स्वत:साठी अवघड करणार नाही. कलाकार प्रोजेक्ट स्वत: लिहितात आणि त्याचे दिग्दर्शन करतात, परंतु माझ्याकडे सध्या ती क्षमता नसल्याचे कोंकणाने म्हटले आहे. कोंकणाने 'पेज ३' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. अलिकडेच ती लाइन इन ए मेट्रोच्या सीक्वेलमध्ये दिसून आली होती. तसेच तिची ए क वेबसीरिज अलिकडेच प्रदर्शित झाली असून तिला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता.



सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूनंतर आयुष्यातील सर्वात कठीण काळातून गेलेली अभिनेत्री रिया चक्रवर्ती आता पूर्णपणे बदलली आहे. तिने चित्रपटांना रामराम ठोकून स्वत:साठी एक नवा मार्ग शोधला आहे. आज ती सुमारे ४० कोटी रुपये मूल्यांकन असलेल्या कपड्यांच्या कंपनीची मालकीण बनली आहे. २०२० नंतर सतत लोकांच्या टीकेचा सामना करताना रियाच करिअर जवळपास संपल्यासारख झाल होत. अभिनयासाठी फोन येणे बंद झाले. त्या काळात रिया आणि तिचा भाऊ शोविक दोघांचेही आयुष्य विस्कळीत झाले होते. याच काळात तिनं आपला पॉडकास्ट 'चॅप्टर २' सुरू केला. तिथे विविध पाहुण्यांच्या संघर्षकथांनी तिला प्रेरणा दिली आणि तिथूनच तिला कपड्यांचा ब्रँड सुरू करण्याची कल्पना सुचली. अशा लोकांकडून प्रेरणा घेणं हा तिच्यासाठी पुन्हा उभं राहण्याची दुसरी संधी होती. रियाने ऑगस्ट २०२४ मध्ये ऑनलाइन ब्रँड Chater 2 Dri सुरू केला. २०२५ च्या जूनमध्ये तिने मुंबईच्या बँद्रा येथे पहिले ऑफलाइन स्टोअर सुरू केले. किराया आणि खर्च वाढतील म्हणून तिला भीती वाटत होती, पण शोविकने तिला धीर दिला. आधीच ऑनलाइन विक्री चांगली होत असल्याने तिला गुंतवणूकदारांचाही विश्वास मिळाला. रियाने सांगितले की, एका पॉडकास्ट गेस्टकडून तिला मोठी प्रेरणा मिळाली. त्यांनी चर्चा करताना अचानक म्हटले, तुम्ही आम्हाला फ्री इक्विटी देऊ शकता. रियाने लगेच उत्तर दिलं, मी फ्री इक्विटी देणार नाही, पण योग्य मूल्य देऊन आम्ही नक्कीच इक्विटी देऊ. त्या गेस्टने सांगितले की ब्रँडमध्ये दम असेल, रेव्हेन्यू येत असेल, नफा होत असेलतर गुंतवणूकदार नक्की येतात. रिया म्हणाली की, तिने कधीही उगाच ५X किंवा १०X मूल्यांकन मागितले नाही. कारण तिच्याकडे आधीच आकडे उत्तम होते आणि कंपनी नफा कमावत होती. रियाने सांगितले शोविकने CAT मध्ये ९६% मार्क मिळवले होते. एका नामांकित कॉलेजमध्ये MBA करायला जाणार होता. पण त्याचवेळी तो जेलमध्ये गेला आणि बाहेर यायला उशीर झाला. पहिले सेमिस्टर संपले होते आणि त्याची MBA ची संधीही गेली.

# कापड उद्योगात रिया चक्रवर्ती



# 'पठाण २' मध्ये ज्युनिअर एनटीआर?



बॉलिवूडचा किंग शाहरुख खानने बऱ्याच काळानंतर २०२३ मध्ये 'पठाण' चित्रपटातून पुनरागमन केले होते. हा चित्रपट रिलीज झाल्यापासून शाहरुख पुन्हा एकदा चर्चेत आला. नुकतीच या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाबद्दल बातमी समोर आली आहे. निर्माते 'पठाण २'च्या तयारीला लागले आहेत. 'पठाण २' देखील यशराजच्या स्पाई युनिव्हर्सचा भाग आहे. आता निर्माते या चित्रपटात शाहरुखच्या विरुद्ध एका मोठ्या अभिनेत्याला घेण्याचा विचार करत आहेत. रिपोर्ट्सनुसार, हा अभिनेता साउथचा स्टार आहे. रिपोर्टनुसार, आदित्य चोप्रा 'पठाण २'मध्ये शाहरुख खानच्या विरुद्ध साऊथचा स्टार ज्युनिअर एनटीआरला घेऊ शकतात. मात्र, निर्मात्यांनी अद्याप ज्युनियर एनटीआरच्या एंट्रीची अधिकृत माहिती दिलेली नाही. हे लक्षात घ्या की ज्युनियर एनटीआर स्पाई युनिव्हर्सचा भाग बनण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी तो हृतिक रोशनसोबत 'वॉर २'मध्ये दिसला होता. 'वॉर २' मध्ये ज्युनियर एनटीआर नकारात्मक भूमिकेत दिसला होता. रिपोर्ट्सनुसार, 'पठाण २' मध्ये ज्युनियर एनटीआरची भूमिका खूपच दमदार असणार आहे. नुकतेच दुबईतील एका कार्यक्रमात शाहरुख खानच्या 'पठाण २'ची पुष्टी झाली आहे. शाहरुख खानही त्या कार्यक्रमाचा भाग होता. रिअल इस्टेटच्या कार्यक्रमात स्टेजवर डेव्हलपर 'पठाण २' बद्दल बोलला होता. तो म्हणाला होता की, जेव्हा एखादा ब्लॉकबस्टर चित्रपट असतो, तेव्हा त्याचा सीक्वल असतो, बरोबर? 'पठाण' प्रमाणे, 'पठाण २' येत आहे. रिपोर्ट्सनुसार, हा सीक्वल केवळ 'पठाण'ची कथा पुढे नेण्यासाठीच नाही, तर वायआरएफच्या स्पाई युनिव्हर्समधील आगामी भागात एका मोठ्या संघर्षाची पायाभरणी करण्यासाठी देखील डिझाइन केला गेला आहे.